# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## गुरुवार, दिनांक २३ मार्च, २०२३

## (दुपारी १२.०० वाजता)

असुधारित प्रत

**एक : प्रश्नोत्तरे.**

**(क)** गुरुवार, दिनांक ९ मार्च, २०२३ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील राखून ठेवण्यात आलेला **श्री.कपिल पाटील, वि.प.स.** यांचा "**राज्यात जातनिहाय जनगणना करण्याबाबत**" या विषयावरील **तारांकित प्रश्न क्रमांक १७३०९**

**(ख) तारांकित प्रश्न**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे –**

**(१) मुख्यमंत्री :**

**(क)** "दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ या कायद्याच्या अंमलबजावणी विषयक सन २०१६-२०१७ ते २०२१-२०२२ या वर्षांचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित यांचे सन २०१९- २०२० व २०२०-२०२१ या वर्षांचे वार्षिक लेखे अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(२) वने मंत्री :** "महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा वार्षिक अहवाल व लेखा" सभागृहासमोर ठेवतील.

**(३) उच्च व तंत्रशिक्षण मंत्री :**

**(क)** "डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे-रायगड यांचे सन २०१२-२०१३ ते २०१५-२०१६ व सन २०१७-२०१८ या वर्षांचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचे सन २०१९-२०२० ते २०२१-२०२२ या वर्षांचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(४) महिला व बाल विकास मंत्री : (क)** "महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग यांचे सन २०१६-२०१७ व सन २०१७-२०१८ या वर्षांचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने —**

**(बुधवार, दिनांक ८ मार्च, २०२३, गुरुवार, दिनांक ९ मार्च, २०२३, सोमवार, दिनांक १३ मार्च, २०२३, मंगळवार, दिनांक १४ मार्च, २०२३, बुधवार, दिनांक १५ मार्च, २०२३, गुरुवार, दिनांक १६ मार्च, २०२३, शुक्रवार, दिनांक १७ मार्च, २०२३ व मंगळवार, दिनांक २१ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेले प्रलंबित म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनेचे निवेदन) — [अनुक्रमांक (१)] —**

(१) **सर्वश्री विक्रम काळे,** शशिकांत शिंदे, अमोल मिटकरी, **वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना **क्रमांक २** वर **उप मुख्यमंत्री** निवेदन करतील :-

पारगांव (ता.दौंड, जि.बीड) येथील एकाच कुटूंबातील ७ व्यक्तींचा मृतदेह आढळून आल्याबाबत.

**(मंगळवार, दिनांक २१ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने) — [अनुक्रमांक (२) ते (४)] —**

(२) **सर्वश्री विक्रम काळे,** अमोल मिटकरी, शशिकांत शिंदे, **वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना **क्रमांक ३३**

अप्रकाशित

वर **उप मुख्यमंत्री** निवेदन करतील :-

उद्योगपती, चित्रपट अभिनेते यांची घरे बॉम्बने उडविण्याच्या धमकीचा फोन नागपूर पोलिसांना आल्याबाबत.

(३) **श्री.शशिकांत शिंदे, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना **क्रमांक ३२** वर **महसूल मंत्री** निवेदन करतील :-

गायरान जमिनीवरील अतिक्रमण काढण्यासंदर्भात शासनाने बजावलेल्या नोटीसबाबत.

(४) **श्री.अमोल मिटकरी, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना **क्रमांक ३७** वर **अन्न व औषध प्रशासन मंत्री** निवेदन करतील :-

खाद्यपदार्थाची विक्री व कॉफी वेंडींग मशीनचा विनापरवाना वापर करण्यास अन्न व औषध प्रशासन यांच्याकडून बंदी असतांना मे. वि वर्क इंडिया मॅनेजमेंट प्रा. लि. सी २० ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स येथे इमारतीच्या काही मजल्यावर कॉफी वेंडींग मशीन खाद्यपदार्थ साठवलेले फ्रिज आढळून आल्याबाबत.

(५) **श्री.सचिन अहिर, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना **क्रमांक ४०** वर **मुख्यमंत्री** निवेदन करतील :-

सांगली जिल्हयातील कृष्णा आणि वारणा नद्यांमध्ये उद्योग, कारखान्यांतून घातक रसायनयुक्त सांडपाणी सोडल्यामुळे होत असलेल्या जलप्रदुषणाबाबत.

(६) **श्री.अंबादास दानवे, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना **क्रमांक ३५** वर **उप मुख्यमंत्री** निवेदन करतील :-

गोंदेगाव (जि.जळगांव) येथील कु.गौरव बोरसे याच्या मृत्युची चौकशी करण्याबाबत.

(७) **श्री.अमोल मिटकरी, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक

अस्वाक्षरित प्रत

महत्वाच्या विषयावरील सूचना **क्रमांक ३८** वर **उप मुख्यमंत्री** निवेदन करतील :-

अंबरनाथ (जि.ठाणे) येथील नववी इयत्तेत शिकणाऱ्या विद्यार्थ्याने केलेल्या आत्महत्येबाबत.

**(८)** **श्री.सुनिल शिंदे, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना **क्रमांक ४२** वर **उप मुख्यमंत्री** निवेदन करतील :-

मुंबई-गोवा महामार्गावर पेण येथील गोविरले फाटा येथून दापोलीहून मुंबईकडे येत असलेल्या एका कुटुंबियांची गाडी अडवून टाकण्यात आलेल्या दरोड्याबाबत.

**(९)** **श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना **क्रमांक ४६** वर **उप मुख्यमंत्री** निवेदन करतील :-

नवी मुंबईतील बेलापूर येथील विकासकाची गोळया झाडून केलेली हत्या.

**(१०)** **श्री.सतिश चव्हाण, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना **क्रमांक ४३** वर **उप मुख्यमंत्री** निवेदन करतील :-

गंगापूर तालुक्यातील कोंडापूर ते भिवधानोरा या रस्त्याच्या बांधकामाबाबत.

**(११)** **श्री.जयंत पाटील, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना **क्रमांक ४१** वर **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** निवेदन करतील :-

रायगड जिल्हा रुग्णालयाच्या दुरुस्तीचे काम मागील १० वर्षांपासून रखडले असल्याबाबत.

**चार : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(सोमवार, दिनांक २० मार्च, २०२३ व मंगळवार, दिनांक २१ मार्च, २०२३**

असुधारित प्रत

**रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (१)] —**

(१) **श्री.रामदास आंबटकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"गडचिरोली जिल्हयातील सिरोंचा तालुक्यात तेलंगणा सिमावर्ती भागात गोदावरी नदीवर मेडीगड्डा प्रकल्प तेलंगणा शासनाने उभारला जाणे, परंतु सदर प्रकल्पामुळे सिरोंचा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित होणे, त्यांच्या भूसंपादन, पूनर्वसन बाबी प्रलंबित असून शेतकऱ्यांना त्याचा मोठा फटका बसणे, सदर प्रकल्पातून तेलंगणाच्या अनेक भागातील १८ लाख ५० हजार एकर शेतीला सिंचनाची सोय करण्याची क्षमता असणाऱ्या प्रकल्पाचे पाणी हैद्राबादपर्यंत नेले जात असणे, परंतु पावसाळयात गोदावरी नदी भरल्यानंतर नदीचे बॅकवॉटर पाणी गोदावरीला येऊन प्राणहिता नदीच्या बॅकवॉटरमुळे सिरोंचा तालुक्यातील अनेक गावात व शेतात पसरले जाणे, त्यामुळे शेतकऱ्यांची शेती खरडून जाणे, त्यात शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होणे, परिणामी सदर प्रकल्पाचा महाराष्टाला सिंचनाचा फायदा न होता उलट नुकसान सहन करावे लागणे, त्यामुळे सिरोंचा तालुक्यातील शेतकऱ्यांचे पुनर्वसन, भूसंपादनाचे प्रश्न व शेतकऱ्यांचे नुकसान भरपाईचा योग्य मोबदला मिळण्याची अत्यंत आवश्यकता, शासनाचे याकडे होणारे दुर्लक्ष, शेतकरी हिताच्या निर्णयासाठी योग्य निर्णय घेऊन न्याय देण्याची आवश्यकता, शासनाचे याकडे होत असलेले दुर्लक्ष, शासनाने यावर तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

**(मंगळवार, दिनांक २१ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (२) व (३)] —**

(२) **श्री.एकनाथराव खडसे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील विविध प्रकल्पांसाठी शासनाने हजारो शेतकऱ्यांच्या लाखो हेक्टर जमिनी संपादित करणे, प्रकल्पासाठी शेतजमीन संपादन झाल्याने शेतकऱ्यांसमोर निर्माण झालेला रोजगाराचा प्रश्न, सदर प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यांना नोकरभरतीमध्ये दिलेले ५ टक्के आरक्षण, २००९ पूर्वी सदर प्रकल्पग्रस्त बेरोजगारांना सरळसेवा भरतीने जेष्ठता क्रमाने व शैक्षणिक पात्रतेनुसार भरती करणे, मात्र दिनांक २७ ऑक्टोबर, २००९ च्या शासन

निर्णयाद्वारे सदर पदभरती ही जाहिरात देऊन सेवाप्रवेश नियमानुसार उमेदवाराची पात्रता तपासून व स्पर्धा परिक्षेद्वारे करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय, प्रकल्पासाठी शेती, घरे संपादित झाल्याने बेघर, निर्धन झालेल्या शेतकऱ्यांच्या पाल्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष, राज्य शासनाकडून अनुकंपा, नोकरभरतीच्या धर्तीवर सरळसेवा पध्दतीने प्रकल्पग्रस्तांच्या ठेवलेल्या जेष्ठता यादीनुसार स्पर्धात्मक परिक्षेशिवाय प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्तांना सेवेत सामावून घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **श्री.महादेव जानकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मौजे सेलू, ता.वाशी, जि. धाराशिव येथे गट नंबर ४४५, ४४६, ४४७ व ४६४ मध्ये मे. इंडीग्रीड कंपनी यांचा कळंब ट्रान्समिशन लि. या नावाने ४००/२०० के. व्ही. चा प्रकल्प प्रस्तावित असणे, या प्रकल्पाकरिता कंपनीने स्थानिक शेतकऱ्यांकडून जागा खरेदी केलेली असणे, शासनाकडून जागेचा NA व लेआउट न करता कंपनीने प्रकल्पाचे अनधिकृत बांधकाम सुरु करणे, खरेदी करण्यात आलेल्या जमिनीभोवती जबरदस्तीने वॉल कंपाउंड बांधणे, खरेदी करण्यात आलेल्या शेत जमिनीतून पिंपळगाव- सेलू सारोळा कवडेवाडी मार्गे वाशी तालुक्यात जोडणारा ६० फुटी ग्रामीण रस्ता (VR-५०) असणे, सदर रस्ता कळंब ट्रान्समिशन कंपनीने परस्पर बंद करून त्यावर खोदकाम व बांधकाम करणे, कंपनीच्या प्रस्तावित कामास ग्रामपंचायत व नागरिकांचा विरोध असणे, अनधिकृत बांधकामाबाबत जिल्हा प्रशासनाकडे पाठपुरावा करून देखील प्रशासनाने नागरिकांच्या मागणीकडे दुर्लक्ष करणे, तालुक्याला जोडणारा (VR-५०) रस्ता कंपनीने अनधिकृतपणे बंद केल्याने स्थानिक नागरिकांची प्रचंड गैरसोय होणे, जिल्हा परिषद बांधकाम विभागाने काम बंद करण्याची नोटीस देऊन देखील कंपनीने काम बंद न करणे, कंपनीने भाडोत्री गुंडांमार्फत स्थानिकांना दमबाजी करणे, मे. इंडीग्रीड कंपनीच्या कळंब ट्रान्समिशन लि. ने बीज प्रकल्पाकरिता प्रस्तावित जमिनीचा NA व लेआउट न करता शासनाचा महसूल बुडवून प्रकल्पाचे अनधिकृत बांधकाम सुरु करणे, तालुक्याला जोडणारा ग्रामीण रस्ता बंद करून स्थानिक नागरिकांना दमबाजी करणे, जिल्हा परिषद बांधकाम विभागाने दिलेल्या नोटिशीकडे दुर्लक्ष करणे, यामुळे स्थानिक लोकांमध्ये मोठ्या प्रमाणात निर्माण झालेला असंतोष व

प्रकल्पास विरोध, यावर शासनाने तात्काळ करावयाची कारवाई व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(४) **डॉ.मनिषा कायंदे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"नवी मुंबई महानगरपालिकेच्या नगररचना विभागाने विकास आराखडा प्रसिद्ध करतेवेळी विकासकांच्या फायद्यासाठी नागरी सोयी सुविधांकरिता आरक्षित असलेल्या भूखंडाच्या झोनमध्ये परस्पर बदल करून विकास आराखडा प्रकाशित करणे व सोईस्कररित्या अपूर्ण माहिती प्रकाशित करणे, नवी मुंबई मनपाचा विकास आराखडा प्रकाशित करताना महासभेने मान्यता दिलेल्या २२६ सूचनांचा समावेश विकास आराखड्यामध्ये केलेला नसणे, सदर विकास आराखड्यामध्ये शासनाच्या नगर विकास विभागाचे दिनांक १४/०६/२०१९ आणि दिनांक ०६/०९/२०२१ चे भूखंडावरील आरक्षणाबाबत शासनाने कलम १५४(१) अन्वये निर्देश दिलेले असल्याने ते नवी मुंबई मनपावर बंधनकारक असणे, असे असताना देखील दिनांक ०३/०१/२०२२ रोजीच्या नगरविकास विभागाच्या आदेशात देण्यात आलेल्या स्थगितीचा कुठेही उल्लेख नसणे, दिनांक ०३/०१/२०२२ रोजीच्या नगर विकास विभागाच्या आदेशाची विकास आराखड्यामध्ये कुठेही माहिती नमूद केलेली नसून जनतेची दिशाभूल करून ही गंभीर बाब जनतेपासून लपवून ठेवल्यामुळे, जनतेला विकास आराखड्यावर आक्षेप नोंदवणे अशक्य होणे, नवी मुंबई मनपा क्षेत्रासाठी महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाने दिनांक १४/०६/२०१९ रोजी च्या शासन आदेशान्वये १४/०६/२०१९ रोजी पर्यंतच्या भूखंडाचे लिलाव सिडकोच्या माध्यमातून अभिप्रेत असताना व दिनांक ०३/०१/२०२२ रोजी भूखंड विक्रीस स्थगिती दिलेली असताना सुद्धा नवी मुंबई मनपा नगररचना विभाग आणि सिडको यांनी संगनमताने दिनांक १४/०६/२०१९ नंतर आरक्षित भूखंडाची लिलावाद्वारे अनधिकृत विक्री करणे, सदर विकास आराखड्यामध्ये प्रकरण ९.२.६ मध्ये रेल्वे स्टेशन परिसरात उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशानुसार सार्वजनिक वाहन तळाबाबत आयआयटी, मुंबई यांनी केलेल्या सर्वेक्षण अहवालात सार्वजनिक वाहनतळ/ पार्किंग व्यवस्था वाढवण्याचे नमूद केलेले असताना देखील नेरूळ रेल्वे स्टेशन येथे तत्कालीन महासभेने मंजूर केलेल्या विकास आराखड्यामध्ये सदर भूखंड क्रमांक ३२ से. १०A हा ट्रान्सपोर्टेशन झोन असून देखील नवी मुंबई मनपाच्या

अप्रकाशित प्रत

नगररचना विभागाने सिडको प्राधिकरणासोबत संगनमताने सोईस्कररित्या झोन बदल करून रहिवास आणि वाणिज्य वापराकरिता करणे, सदर नेरूळ स्टेशन परिसरात पार्किंगची गंभीर समस्या असताना देखील नवी मुंबई मनपाच्या नगररचना विभागाने सदर भूखंडाकरिता ट्रान्सपोर्ट झोन मध्ये बदल करून रहिवास आणि वाणिज्य असा करणे, नेरूळ स्टेशन परिसरातील नागरिकांचा सदर झोन बदलास विरोध असून सदर भूखंड सार्वजनिक वाहनतळांकरिता आरक्षित ठेवण्यात यावा व या गंभीर प्रकरणात दोषी असलेले नवी मुंबई मनपाचे तत्कालीन आयुक्त व नगररचना विभागाचे अधिकारी यांच्यावर करावयाची कारवाई व उपाययोजना तसेच शासनाची प्रतिक्रिया."

(५) **श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबई उपनगरातील कांदिवली, ता.बोरीवली येथील क्लस्टर डेव्हलपमेंट योजनेच्या प्रस्तावाबाबत एल्टी गीजे सी.एच.एस कडून दिनांक ०५/१२/२०२२ आणि दिनांक ०१/०२/२०२३ रोजी प्राप्त झालेल्या पत्रानुसार आणि दिनांक ०५/१२/२०२२ रोजी महापालिका आयुक्तांना उद्देशून लिहिलेल्या पत्रानुसार सोसायटी किंवा जि.बी.आर. (जनरल बॉडी रिझोल्यूशन) यांच्या संमती आणि पुष्टीशिवाय सितारा बिल्डर्स प्रायव्हेट लिमिटेडने दिनांक २१ डिसेंबर २०२२ रोजी क्लस्टर डेव्हलपमेंट स्कीम सादर केली असणे, ज्यात एल्टी गीजे सी.एच.एस. समाविष्ट असणे, सोसायटीने दिनांक २४ नोव्हेंबर २०२२ रोजी उपमुख्य अभियंता इमारत प्रस्ताव (आर-सेंट्रल) डब्ल्यू.एस. II कडे चुकीच्या पद्धतीने सादर केल्याबद्दल आक्षेप घेतला असणे, सोसायटीचा लेखी आक्षेप असूनही डीवायसीई डब्ल्यू.एस. II- आर-सेंट्रल ने सीडीएस प्रस्ताव एम.सी.जी.एम. आयुक्तांकडे पाठवला असणे, उच्चाधिकार समितीने आपल्या दिनांक ११/०१/२०२३ च्या बैठकीत हा प्रस्ताव मान्य करून, सोसायटीच्या आक्षेपानंतरही प्रस्ताव नगरविकास विभागाकडे पाठविला असणे, एल्टी गीजे सी.एच.एस सोसायटीमध्ये १७२ सदस्य असून मेसर्स सितारा बिल्डर्स प्रायव्हेट लिमिटेडने माहे मे, २०२२ मध्ये लबाडीने आणि चुकीच्या हेतूने ३८ सभासदांकडून परस्पर संमती मिळवून त्यांना कोणत्याही अधिकाराशिवाय आणि सोसायटीच्या जनरल बॉडी ठरावा शिवाय पाठिंबा दिलेला असणे, (३८ सभासदांपैकी ६ सदस्यांनी त्यांची संमती काढून घेतली

अग्रिम प्रत

असणे) संमतीचे उघड निरीक्षण केल्यावर हे स्पष्टपणे उघड होते की एस.जी.एम. किंवा इतिवृत्तांचे तपशील हेतुपुरस्सर रिक्त सोडले गेले असणे, कारण अशी कोणतीही मिनिटे/ठराव मेसर्स सितारा बिल्डर्स प्रायव्हेट लिमिटेडच्या बाजूने वैयक्तिक संमतीच्या अंमलबजावणीसाठी मंजूर केलेला नसणे, सदस्यांची किमान ५१% संमती मिळवल्याशिवाय, डेप्युटी सी.एच.ई. (बी.पी.) डब्ल्यू.एस. II सी.डी.एस. मध्ये असा प्रस्ताव कसा स्वीकारू शकत नाही, तरीही सदरील प्रस्ताव उच्चाअधिकार समितीमध्ये मंजूर केला असणे, सदरील इमारत ही जिर्ण अवस्थेत असल्याने या क्लस्टर डेव्हलपमेंटचा प्रस्ताव तात्काळ थांबविण्यात येऊन मेसर्स सितारा बिल्डर्स प्रायव्हेट लिमिटेडने सादर केलेल्या त्यांच्या या प्रस्तावातून एल्टी गीजे सी.एच.एस. ला काढून टाकण्याबाबत तसेच कांदिवली, ता.बोरिवली येथील सी.टी.एस. क्रमांक ४/१० (पी.टी.) असलेल्या भूखंडाचा समावेश करण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व यावर शासनाची प्रतिक्रिया."

(६) **श्री.आमश्या पाडवी,** ॲड.अनिल परब, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मे.मैनदिप एंटरप्रायजेस कंपनीने मेहबूब स्टुडिओ जंक्शन, वांद्रे-प. येथे सन २०१८ साली केलेल्या खराब कामासाठी मुंबई महापालिकेच्या रस्ते विभागाने सदर कंपनीचा ५ वर्षासाठी काळया यादीत समावेश केलेला असणे, परंतु सदर कंपनीचा काळया यादीतील समावेश कोणत्याही कारणाशिवाय ५ वर्षे ऐवजी ३ वर्षे इतका कमी केलेला असणे, सदर कंपनी नालेसफाई व मिठी नदी साफसफाईच्या कामासाठी पात्र होणे, सदर कंपनीचा पूर्व इतिहास पाहता सदर कंपनीस मिठी नदीच्या साफसफाईच्या कामासाठी महापालिकेच्या पर्जन्य जलवाहिनी विभागाकडून कारणे दाखवा नोटीस देण्यात येणे, परंतु तरीदेखील सदर कंपनीने मिठी नदी सफाईच्या नुकत्याच जाहिर झालेल्या निविदेसाठी निविदा भरणे, नव्या निविदा भरण्यासाठी बनावट कागदपत्रांचा वापर करणे, सदर कंपनीने मूळ उत्पादक कंपनी ही नेदरलँडस्थित मोबॅर्न असतांना क्लिनटेक इन्फ्रा या कंपनीला मूळ उत्पादक कंपनी दाखवून त्यांचे बनावट हमीपत्र सादर करणे, पर्जन्य जलवाहिनी विभागातील अधिकाऱ्यांनी सदर कंपनीला अपात्र करण्यासाठी अहवाल सादर केलेला असतांना त्याच विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कंपनीशी संगनमत करुन सदर कंपनीला पात्र करण्यासाठी अपात्र अहवाल दुर्लक्षित करुन पात्र करणे, सदर कंपनीबाबत

अग्रिम प्रत

बनावट कागदपत्रांच्या अनेक तक्रारी प्राप्त झालेल्या असतांनादेखील कोणतीही चौकशी न करता सदर कंपनीचा बचाव करणे, अशा गैरप्रकारामुळे महापालिकेची आंतरराष्ट्रीय पातळीवर बदनामी होण्याची शक्यता असणे, याबाबत शासनाने तातडीने योग्य ती कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रीया व भूमिका."

(७) **श्री.गोपिचंद पडळकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात आदिवासी बहुल भागातील आदिवासींचे ख्रिस्ती धर्मात आणि राज्यातील मुली अणि महिला यांना फसवून त्यांचे इस्लाम मध्ये धर्मांतर करण्याचे षडयंत्र गेली अनेक दशके प्रचंड मोठ्या प्रमाणात सुरू असल्याचे निदर्शनास येणे, नुकतेच लव्ह जिहाद मधून घडलेल्या आफताबच्या केसमध्ये भयावह गोष्टी देशासमोर येणे, अशा घटनांचे तक्रार, निवेदनांवर पोलीस प्रशासनाकडून जलदगतीने कारवाई होत नसणे, मात्र धर्मांतराच्या प्रकरणी तत्परतेने अटक होऊन संबंधितांवर कारवाई होण्याच्या घटना अत्यल्प असणे, नुकतेच पालघर जिल्ह्यातील डहाणू येथील एका आदिवासी महिलेने धर्मांतराच्या उद्देशाने आलेल्या चार ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या विरोधात पोलीस ठाण्यात तक्रार केल्याचे माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, पोलीस प्रशासनाची निष्क्रियता, भ्रष्टाचार, पीडितांनी पुढे येणे, लढयासाठी लागणारे मनोधैर्य, पैसा आणि पुढाकार आदी अनेक गोष्टी आरोपींना शिक्षा होणे किंवा न होणे यासाठी कारणीभूत असल्या तरी कायदा झाल्यामुळे पीडितांना 'आपल्या पाठीशी कायदा आहे' असे नैतिक पाठबळ असणे हे पाठबळ त्यांना अन्यायाच्या विरोधात आवाज उठवण्यास आणि धर्मांतर करणाऱ्यावर वचक बसवण्यास निश्चितपणे उपयोगी ठरण्याची आशा असणे, हिंदू व आदिवासी बांधवांच्या दृष्टीने धर्मांतराचा कायदा हा अनन्यसाधारण महत्त्वाचा असणे, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, छत्तीसगड, ओडीसा,गुजरात आणि हिमाचल प्रदेश या राज्यात धर्मांतर विरोधी कायदा अस्तित्वात असणे, त्यामुळे याच धर्तीवर महाराष्ट्रात देखील वाढत्या धर्मांतर व लव्ह जिहादच्या घटनांना आळा घालण्यासाठी धर्मांतर विरोधी कायदा लागू करुन त्याची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता असणे, अशी मागणी देखील राज्यात विविध ठिकाणी निघालेल्या मोर्चे, आंदोलनातून केली जात असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(८) **श्री.प्रविण दरेकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"शनिवार दिनांक १८ मार्च, २०१३ रोजी दहिसर मुंबई येथे भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यावर जीवघेणा हल्ला करण्यात येणे, हल्ला करणाऱ्यांमध्ये अंदाजे ४० पेक्षा जास्त गुन्हेगारांचा समावेश असणे, हा हल्ला होत असताना, सदर घटना सी.सी.टी.व्ही. फूटेज मध्ये चित्रीत हाणे, सदर घटना प्रकरणाचा गुन्हा दाखल करण्यासाठी पोलीस स्थानकामध्ये फिर्यादी गेले असता, गुन्हा नोंद करतांना स्थानिक पोलीस प्रशासनाकडून टाळाटाळ करण्यात येणे, सी.सी.टी.व्ही. फुटेज मध्ये सदर घटना व हल्लेखोर स्पष्ट दिसत असतांनाही व स्पष्ट पुरावे असतानाही स्थानिक पोलीस निरीक्षक व उपायुक्त (मुंबई पोलीस) यांच्या कडून अक्षम्य दुर्लक्ष करण्यात येणे, गुन्हे दाखल करताना टाळाटाळ तर होणेच परंतु कलम लावतानाही किरकोळ कलमे (भा.द.वि.) लावण्यात येणे, शताब्दी रुग्णालयाच्या प्रशासनानेही जखमी कार्यकर्त्याला ॲडमिट करतांना दिरंगाई करणे, त्यामुळे संपूर्ण दहिसर परिसरात अनागोदींची परिस्थिती निर्माण होणे, ५० ते ५५ नागरिकांनी हल्ला करूनही त्यांच्यावर कारवाई न होणे, ते मोकाट असल्याने संपूर्ण दहिसर परिसरातील नागरिकांमध्ये निर्माण झालेली भितीची व असुरक्षिततेची भावना, ही परिस्थिती बदलून जनतेमध्ये सुरक्षा निर्माण होण्यासाठी स्थानिक पोलीस प्रशासनातील आरोपींना पाठीशी घालणाऱ्या पोलीस निरीक्षक व उपायुक्त यांच्यावर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, या प्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही व भूमिका."

(९) **श्री.रामराजे नाईक-निंबाळकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"पुणे जिल्हयातील भोर तालुक्यात नीरा देवघर प्रकल्पामधील शिल्लक राहणाऱ्या किंवा बचत झालेल्या पाणी साठयामधून कायमस्वरुपी दुष्काळी असलेल्या सांगोला, खंडाळा, पंढरपूर, फलटण आणि माळशिरस तालुक्यातील दुष्काळग्रस्त गावांना प्रत्येकी ०१ टी.एम.सी. असे एकूण ०३ टी.एम.सी. पाणी बंदिस्त पाईपलाईनद्वारे नातेपुते येथून नीरा उपसा कालव्यात सोडण्यात यावे अशी मागणी तेथील लोकप्रतिनिधी व जनतेने केलेले असून ही

मागणी वाढत असणे, त्याचप्रमाणे राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीकडून नीरा देवघर प्रकल्पाच्या तृतीय सुधारित प्रकल्पास मिळालेली मान्यता, नीरा देवघर प्रकल्पातून धोम बलकवडी प्रकल्प चारमाही ऐवजी आठमाही करण्याकरिता लागणारे ०.९३ टी.एम.सी. पाणी उपसा सिंचन योजनेतून देणे गरजेचे असणे, सन २०२२-२३ च्या आर्थिक वर्षाचे निधी नियोजन पूर्ण झालेले असून रु.३,९७६.८३ कोटी इतक्या रकमेची सुधारित प्रशासकीय मान्यता दिनांक ३१ जानेवारी, २०२३ च्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मिळालेली असणे, निधी उपलब्धतेनुसार रु.१००० हजार कोटींच्या कामांच्या तात्काळ निविदा काढण्यास मान्यता मिळणे आवश्यक असणे, तरच प्रकल्पाचे उर्वरित ३५ टक्के काम जलद गतीने पूर्ण होण्यास मदत होणार असून फलटण, खंडाळा, पंढरपूर व माळशिरस या तालुक्यातील दुष्काळी भागातील गावांना न्याय मिळावा यासाठी राज्य शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिकिया."

(१०) **सर्वश्री सतिश चव्हाण,** विक्रम काळे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"वाळुंज महानगर (छत्रपती संभाजीनगर) परिसरात औद्योगिक वसाहतीमुळे परिसराचा झपाटयाने विकास झाला देशभरातून नोकरी व व्यवसायासाठी लाखो नागरिक स्थायिक झाले असणे, त्यामुळे परिसरातील शेतकरी व खाजगी विकासकांनी स्वतःच्या जमिनीवर प्लॉटींग करुन जमिनी विकसीत केल्या असणे, वाळुंज परिसरातील स्थायिक झालेल्या नोकरी/व्यवसाय निमित्त आलेल्यांनी जागा घेऊन घरे बांधली परंतु नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक यांनी दिनांक १२ जुलै २०२१ अन्वये तुकडा बंदीचा आदेश पारित केला असणे, सर्वसामान्य कामगार, मजूर इत्यादींना घर घेण्याचे व शेतकऱ्यांच्या जमिनी विकसीत करण्याचे स्वप्न भंगले असणे, सदर तुकडा बंदी विरोधात शेतकरी व विकासकांनी उच्च न्यायालय, खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर येथे आव्हान दिले असणे व न्यायालयाने दिनांक ०५ मे, २०२२ रोजी नोंदणी महानिरीक्षक यांचा तुकडा बंदीचा आदेश रद्द ठरवून दस्तनोंदणी करण्याचे आदेश दिले असणे, उच्च न्यायालयाचा आदेश शासनाने अद्याप मान्य न केल्याने व त्यावर कोणतीही सकारात्मक कार्यवाही न झाल्याने दस्तऐवज नोंदण्या रखडल्या असणे, ज्या नागरिकांनी भूखंड घेतला तो त्यांच्या नावावर होत नसणे, तर सर्वसामान्य नागरिकांस भूखंड घेता येत नसणे, उच्च

अग्रिम प्रत

न्यायालयाच्या दिनांक ०५ मे २०२२ च्या आदेशानुसार शासनाने तात्काळ कार्यवाही करुन दस्तऐवज नोंदण्या करण्यासाठी मान्यता देण्याची आवश्यकता असणे, यावर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(११) **श्री.सुरेश धस**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात दुध व दारुमध्ये भेसळ करण्याचे सातत्याने आढळून येत असलेले प्रकार, बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यामध्ये दुध उत्पादन हा शेतकऱ्यांचा जोडधंदा असून सुमारे सव्वादोन लाख लिटर दुध उत्पादन होत असणे, आष्टी शहरातील संभाजीनगर भागात जगदंबा मिल्क अँण्ड प्रॉडक्टस् यांच्या मालकीचे घर मागील एक महिन्यापासून भाडे तत्वावर दिले असल्याचे निदर्शनास येणे, या घरात १३२ गोण्या पावडर, रसायन आणि २२० पाम तेलाचे डबे जप्त करण्यात येणे, या प्रकरणी जगदंबा मिल्क दुकानाचे मालक यांच्यावर गुन्हा दाखल झाला असणे, तसेच अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा येथे एका घरात बनावट दुध तयार करण्याचे साहित्य ठेवत असल्याचे निदर्शनास येणे, दररोज सुमारे ३० हजार लिटर बनावट दुध तयार होत असल्याची बाब निदर्शनास येणे, दिनांक १६/३/२०२३ रोजी २५ किलो क्षमतेच्या एका उघडलेल्या बॅगमध्ये २१ किलो व्हे परमिटे पावडरचा साठा व ४० लिटर क्षमतेच्या प्लॅस्टिक व कॅनमध्ये ३५ लिटर लाईट लिक्विड पॅराफिनचा साठा आढळल्याचे निदर्शनास येणे, या प्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात एफआयआर नोंद असणे, परिणामी आष्टी तालुक्यात सर्वसाधारण नागरिकांच्या मनात निर्माण झालेली तीव्र भिती व संतापाची लाट, अशाप्रकारे राज्यात दारु व दुधामध्ये भेसळीचे प्रकार मागील काही वर्षापासून सातत्याने सर्रास सुरु असल्याचे निदर्शनास येणे, या प्रकारामुळे राज्यातील अनेकांच्या विशेषत: बालकांच्या जीवीतास नाहक धोका निर्माण होणे, काही प्रकरणी निष्पाप व्यक्तींचे बळी जाणे इ.प्रकार आढळून येणे, ही बाब गंभीर असल्याने याबाबत कठोर कारवाई होण्याच्या दृष्टीने अन्न भेसळ अधिनियम महाराष्ट्र राज्यास लागू असताना त्यात या गुन्ह्याबद्दल अधिक कठोर शिक्षेची तरतूद करण्याची आवश्यकता, आष्टी तालुक्यात नुकत्याच घडलेल्या दुध भेसळीच्या वरील प्रकाराची तातडीने चौकशी करण्याची व दोषींना कठोर शिक्षा करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना."

अप्रकाशित प्रत

**पाच : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास)**

## - मध्यंतर -

**सहा : शासकीय विधेयके —**

**(क) विधानसभेने संमत केल्यास - विधेयक विचारात घेणे -**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १६ — महाराष्ट्र विनियोजन विधेयक, २०२३"

---

**(ख) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विधेयक विचारात घेणे.**

(१) "सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १२ — महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत विधेयक, २०२३"

(२) "सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३ — महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर (सुधारणा) विधेयक, २०२३"

---

**(ग) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विचार पुढे सुरु, खंडशः विचार व संमत करणे.**

"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ — महाराष्ट्र लोक आयुक्त विधेयक, २०२२"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, अभिजीत वंजारी, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ — महाराष्ट्र लोक आयुक्त विधेयक, २०२२" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(घ) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विचार, खंडशः विचार व संमत करणे.**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ — पंढरपूर मंदिरे

अग्रिम प्रत

(सुधारणा) विधेयक, २०२३."

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, एकनाथराव खडसे, सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील, अभिजीत वंजारी, अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.मनिषा कायंदे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ – पंढरपूर मंदिरे (सुधारणा) विधेयक, २०२३" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**सात** : **सर्वश्री अंबादास दानवे**, सतेज उर्फ बंटी पाटील, एकनाथराव खडसे, सचिन अहिर, अशोक ऊर्फ भाई जगताप, शशिकांत शिंदे, ॲड.अनिल परब, सर्वश्री अभिजीत वंजारी, विक्रम काळे, डॉ.मनिषा कायंदे, सर्वश्री राजेश राठोड, अनिकेत तटकरे, जयंत पाटील, नरेंद्र दराडे, डॉ.वजाहत मिर्झा, सर्वश्री सतीश चव्हाण, विलास पोतनीस, डॉ.प्रज्ञा सातव, सर्वश्री अमोल मिटकरी, आमश्या पाडवी, जयंत आसगावकर, अरुण लाड, सुनिल शिंदे, धीरज लिंगाडे, सुधाकर अडबाले, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव –**

"राज्याची ढासळलेली कायदा व सुव्यवस्था, मोठ्या शहरात संघटीत गुन्हेगारीत झालेली वाढ, वाळूमाफिया, मुरुममाफियांची वाढलेली दादागिरी, गँगस्टरशी संबंध असलेल्या ठाणे महानगरपालिकेतील सहाय्यक आयुक्तावर पोलीस कारवाई करण्यात अक्षम्य दिरंगाई झाली असणे, खंडणी टोळ्या सक्रीय झाल्याने उद्योजक, व्यावसायिकांमध्ये पसरलेले भीतीचे वातावरण, छत्रपती संभाजीनगरमध्ये कोयता गँगची पसरलेली दहशत, जनतेतून तीव्र विरोध होत असल्याने आंतरधर्मीय समिती बरखास्त करण्याची आवश्यकता, आंतरधर्मीय कुटुंबात घरगुती हिंसाचाराला वेगळे स्वरुप दिले जात असल्याने सामाजिक अशांतता निर्माण झाली असणे, नामांतर वादातून समाज भावना भडकावण्याचा होत असलेला प्रयत्न, पोलिसांवर पडणारा ताण, पोलिसांच्या घरांचा प्रलंबित प्रश्न, पोलीस दलातील बढत्या, बदल्या रखडल्याने पोलीस दलात पसरलेला असंतोष, राज्यात लोकप्रतिनिधी व खाजगी व्यक्तींकडून झालेला गोळीबार, राजकीय कार्यकर्ते, लोकप्रतिनिधींवर होणारे हल्ले व सुडबुध्दीने होणारी कारवाई, राज्यात संचार आणि विचार स्वातंत्र्याचा होत असलेला संकोच, पत्रकारांची झालेली हत्या, लव्हजिहाद, अपहरण, दरोडे, सायबर गुन्हे, घरफोड्या यासारख्या गुन्ह्यांना आळा

अप्रकाशित प्रत

घालण्यात आलेले अपयश, अंमली पदार्थ, गुटखा व्यापार, जुगार, मटका या अवैध धंद्यात झालेली अपरिमित वाढ, अल्पवयीन मुले, मुली व महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये झालेली वाढ, शक्ती कायद्याची रखडलेली अंमलबजावणी, हरवलेल्या महिलांचा शोध घेण्यात आलेले अपयश, बालविवाहाला प्रतिबंध घालण्यात सरकारला येत असलेले अपयश, सरकारने कॉपीमुक्त अभियानाची घोषणा केली असली तरी दहावी व बारावी परिक्षेत मोठ्याप्रमाणावर कॉपी व प्रश्नपत्रिका फोडण्याचे झालेले प्रकार, अवैध सावकारीला प्रतिबंध घालण्यात सरकारला आलेले अपयश, राज्याच्या विविध विभागात भ्रष्टाचार व अनियमिततांची प्रकरणे उघडकीस येऊनही सरकार चौकशी करण्याबाबत सकारात्मक नसणे, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृध्दी महामार्गाच्या कामात हजारो कोटी रुपयांच्या उघडकीस आलेल्या गौण खनिज घोटाळ्याची चौकशी करण्याची आवश्यकता, मदत व पुनर्वसन विभागात आपत्कालीन कामाच्या नावाखाली झालेला ७७०० कोटींच्या कामाचा घोटाळा, जळगावातील कुबेर ऑनलाईन, मटका रॅकेट, आदिवासी विकास विभागातील भ्रष्टाचारी उपायुक्त व अतिरिक्त आयुक्तांना सेवेत घेऊन कार्यकारी पदावर केलेली नेमणूक, महाज्योती, बार्टी, सारथी व महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांच्या ढिसाळ कारभारामुळे बेरोजगार वर्ग निराश होणे, तसेच सध्या साथीच्या रोगात वाढ झाली असून त्यात अजून नवीन साथीच्या रोगाची भर पडणे, H३ N२ या रोगात वाढ होत असताना करोनानंतर डोसमुळे हृदय विकार, श्वसनाचे विकार व इतर शारिरीक व्याधी मध्ये वाढ होणे, त्याची सरकारने घ्यायची गांभीर्याने दखल, वेगवेगळ्या योजनेतून मोफत आरोग्य सेवा, शस्त्रक्रिया, औषधे याची सरकारने जाहिरात करणे, परंतु प्रत्यक्षात लाभ न मिळणे, मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये निकषात न बसलेले प्रस्ताव मंजूर केल्यामुळे निधीची कमतरता त्यामुळे पात्र गरीब जनतेवर होत असलेला अन्याय, रुग्णालयातून मानवी अवयव तस्करीचे होत असलेले गुन्ह्या प्रकरणी आवश्यक असलेल्या गरीबांना न्याय न मिळणे, असाध्य रोगासाठी रुग्णांना टाटासारख्या रुग्णालयावर अवलंबून न राहता तशाच प्रकारची विभागीय रुग्णालये सुरु करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

अप्रकाशित प्रत

**आठ : (क) (मंगळवार, दिनांक १४ मार्च, २०२३, बुधवार, दिनांक १५ मार्च, २०२३, गुरुवार, दिनांक १६ मार्च, २०२३, शुक्रवार, दिनांक १७ मार्च, २०२३, सोमवार, दिनांक २० मार्च, २०२३ व मंगळवार, दिनांक २१ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प.**

**नियम २६० अन्वये प्रस्ताव)** –

**सर्वश्री प्रविण दरेकर,** विजय ऊर्फ भाई गिरकर, प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री रमेशदादा पाटील, श्रीकांत भारतीय, राजहंस सिंह, विप्लव बाजोरीया, प्रा.राम शिंदे, सर्वश्री महादेव जानकर, प्रविण दटके, श्रीमती उमा खापरे, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव – (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)** –

"माहे जुलै, २०२२ नंतर मुंबई शहराच्या विकासाची नियोजनात्मक व कालबद्ध कामे हाती घेण्यात आली असल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर असून या शहराच्या नावलौकीकाला साजेसे असे ५०० पेक्षा अधिक सुशोभिकरणाचे प्रकल्प मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री महोदयांच्या नाविन्यमय कल्पकतेतून सुरु असणे, गेल्या अनेक वर्षापासून मुंबई शहराला एसटीपी पासून दूर ठेवण्यात आले असताना मागील तीन महिन्यांमध्ये मुंबई शहरात ७ ठिकाणी एसटीपीच्या प्रकल्पांचे भूमिपूजन होऊन काम सुरु झाल्याचे निदर्शनास येणे, मुंबई शहरात मोठ्या प्रमाणावर रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ते अशा प्रकारचे चित्र दिसत असून खड्डे बुजविणे व डांबरीकरणाकरिता मागील २५ वर्षात २१ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम खर्च करण्यात येऊनही मुंबई शहराच्या रस्त्यांची प्रचंड दुरवस्था झाली असल्याने मुंबईकरांच्या मनामध्ये निर्माण झालेली उद्विग्नता, मागील ६ महिन्यांमध्ये विद्यमान शासनाने महानगरपालिकेला आदेश दिल्यानंतर मुंबई शहराच्या ४५० कि.मी.च्या रस्त्यांच्या कॉंक्रिटीकरणाची ६ हजार कोटींपेक्षा जास्त रक्कमेची निविदा काढण्यात येऊन त्यासंदर्भातील वर्कऑर्डर्स निघाल्यानंतर संबंधित कामांचे भुमिपूजन पंतप्रधानांच्या हस्ते झाले असणे, मुंबई शहरात मोठ्या प्रमाणावर सन २०१४ ते २०१९ या कालावधीमध्ये सुमारे ३०० कि.मी.च्या मेट्रोचे काम सुरु होऊन मध्येच खोळंबल्याची बाब निदर्शनास येणे, आरे कारशेडच्या मुद्यामुळे मुंबईच्या मेट्रोच्या कामात विलंब झाल्याने मेट्रो कारशेडच्या खर्चात १० हजार कोटी पेक्षा अधिक वाढ झाल्याचे आढळून येणे व परिणामी मेट्रोचे अपेक्षित ध्येय अद्यापही गाठता न येणे, मेट्रो २-ए आणि २-बी ची सेवा सुरु झाल्याने पश्चिम द्रुतगती मार्गावरील अंधेरी आणि दहिसरच्या मध्ये वाहतुक कोंडी कमी होऊन मुंबईकरांचा प्रवास सुकर झाल्याचे निदर्शनास येणे, विद्यमान शासनाने मेट्रो प्रकल्पांचे काम जलद गतीने सुरु केल्याने व सन २०२४ ते २०२६ या कालावधीत मेट्रो तसेच कोस्टल रोड

अप्रकाशित प्रत

प्रकल्प पूर्ण होण्याचे स्वप्न दृष्टीपथास आल्याने मुंबईकरांचे जीवनमान उंचावले असून मुंबईची तकदीर व तसबीर बदलली असल्याची बाब दिसून येणे, मुंबईतील कोळीवाडा आणि गावठाणाकरिता सिमांकन करुन वेगळी विकास नियंत्रण नियमावली तयार करण्याची प्रक्रिया अद्यापही प्रलंबित राहिल्याने मुंबईतील कोळीवाडे व गावठाणांची झालेली दुरवस्था तातडीने विचारात घेण्याची आवश्यकता, मुंबईतील व रेल्वे स्थानकांच्या दोन्ही बाजूकडील झोपडीधारकांच्या पात्रता निश्चितीसाठी एक खिडकी व कालबद्ध स्थलांतरण योजना तयार करण्याची आवश्यकता, मुंबईतील उपकर प्राप्त जुन्या व मोडकळीस आलेल्या खाजगी इमारतींचा पुनर्विकास करण्याचे, तसेच एसआरए प्रकल्पबाधितांच्या न्यायप्रविष्ट प्रकरणांच्या संदर्भातील शासनाचे धोरण, मुंबई शहरात दिड लाख फेरीवाले पात्रताधारक असूनही त्यांना जागेचे वाटप करण्यात न आल्याने पदपथांवर ते व्यवसाय करीत असल्याचे निदर्शनास येणे, त्यांच्याकरिता मार्केट झोन निर्माण करण्याची आवश्यकता जेणेकरुन, पदपथ मोकळे होऊन वाहतुक कोंडी होणार नाही, मागील २५ वर्षात मुंबई महानगरपलिकेच्या स्थायी समितीमार्फत किमान ३ लाख कोटींपेक्षा जास्त कामाच्या निविदा मंजूर होऊन त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास येणे, कोविडच्या काळात वैद्यकीय साहित्य खरेदी-विक्रीच्या विभागात हजारो कोटींचा भ्रष्टाचार झाल्याची बाब निदर्शनास येणे, टॅब खरेदी, सफाई कामगार वसाहत पुनर्विकासाच्या आश्रय योजनेमध्ये १८०० कोटींचा भ्रष्टाचार झाल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई महानगरपालिकेंतर्गत मागील शासनाच्या काळात जिजामाता उद्यान प्राणी संग्रहालयांच्या आधुनिकीकरणाचा प्रकल्प, ९०० इलेक्ट्रीक बसेसची खरेदी यामध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास येणे, मुंबई व उपनगरात रिक्षा व खाजगी वाहनांचे पार्किंगकरिता बहूमजली वाहनतळे उभी करण्याची आवश्यकता, देशातील प्रदुषणग्रस्त शहरामध्ये मुंबईचा अग्रक्रम असल्याचे निदर्शनास आल्याने शहरातील नालेसफाई करण्याकरिता आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याची व मुंबई आणि उपनगरातील कचऱ्याची वैज्ञानिक पद्धतीने विल्हेवाट लावण्याची योजना कार्यान्वित करण्याची आवश्यकता, मुंबईत गोवंडीतील डंम्पिंग ग्राऊंड आणि जैववैद्यकिय कचऱ्यावरील प्रक्रिया प्रकल्पांमुळे गोवंडी, शिवाजीनगर, देवनार परिसरात मागील १० वर्षांत झालेला अंदाजे १,८७७ जणांचा मृत्यू, प्रदूषणामुळे मुंबईतील नागरिकांना मोठ्या प्रमाणावर होत असलेली क्षयरोगाची बाधा, पर्यावरण संतुलन राखण्यासाठी मोजता येईल अशा पॅरामिटरच्या

अमुद्रित प्रत

(कॉन्टीटेटीव्ह गोल्सच्या) आधारावर पर्यावरण धोरण आखून कार्यवाही करण्याची आवश्यकता, मुंबई व उपनगरातील महानगरपालिका, नगरपालिका क्षेत्रात भरावा लागणारा बिनशेतीकर रद्द करण्याची आवश्यकता, विद्यमान शासनाच्या काळात कायदा व सुव्यवस्थेमध्ये झालेली प्रचंड सुधारणा, त्यामुळे मुंबईकर मोकळा श्वास घेत असल्याची बाब निदर्शनास येणे, कॅगच्या लेखा परिक्षण अहवालातील वस्तुस्थितीदर्शक सत्यता मुंबईकरांपुढे येण्याची आवश्यकता, मुंबईमध्ये डबेवाला भवन व मराठी भाषा भवन तातडीने निर्माण करण्याची आवश्यकता, मुंबई महानगरपालिकेची मान्यता न घेता जवळपास १९४ अनधिकृत शाळा सुरू असल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई महानगरपालिकेंतर्गत मराठी शाळांची पटसंख्या दिवसेंदिवस कमी झाल्याची बाब निदर्शनास येत असल्याने मराठी शाळांना आधुनिकतेची व कौशल्य विकास अभ्यासक्रमाची जोड देऊन मराठी विद्यार्थी व पालकांना मराठी भाषेच्या शाळांकडे आकर्षित करण्याची आवश्यकता, मुंबईतील रुग्णालयांमध्ये मुंबईबाहेरून येणाऱ्या रुग्णांची संख्या अधिक असल्याने व अनेकांना अतिदक्षता विभागात ठेवून उपचार करण्याची गरज असल्याने तेवढ्या प्रमाणात व्हेंटीलेटर उपलब्ध नसल्याचे निदर्शनास येणे, मुंबईतील महानगरपालिका व सरकारी रुग्णालयात व्हेंटीलेटरची संख्या वाढविण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

(ख) **(गुरुवार, दिनांक १६ मार्च, २०२३, शुक्रवार, दिनांक १७ मार्च, २०२३, सोमवार, दिनांक २० मार्च, २०२३ व मंगळवार, दिनांक २१ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव)** —

**सर्वश्री अंबादास दानवे**, सतेज उर्फ बंटी पाटील, एकनाथराव खडसे, ॲड.अनिल परब, सर्वश्री अशोक ऊर्फ भाई जगताप, शशिकांत शिंदे, जयंत पाटील, नरेंद्र दराडे, अभिजीत वंजारी, विक्रम काळे, विलास पोतनीस, राजेश राठोड, अनिकेत तटकरे, सचिन अहिर, वजाहत मिर्झा, सतीश चव्हाण, सुनिल शिंदे, डॉ.प्रज्ञा सातव, सर्वश्री जयंत आसगावकर, अमोल मिटकरी, धीरज लिंगाडे, अरुण लाड, डॉ.मनिषा कायंदे, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव** —

"राज्याच्या आरोग्य विभागात सुमारे १७ हजार पदे रिक्त असणे,

अप्रकाशित प्रत

शासकीय रुग्णालयात औषधांचा असणारा तुटवडा, राज्यात एच३एन२ विषाणूचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता, एकूणच आरोग्य व्यवस्थेकडे सरकारचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, कट प्रॅक्टिसच्या माध्यमातून रुग्णांचे होणारे शोषण थांबवण्यासाठी कठोर कायदा करण्याची आवश्यकता, राज्यात अवैधपणे सुरु असलेल्या लॅबवर कारवाई करण्याकडे होत असलेले दुर्लक्ष, निवासी डॉक्टरांच्या मागण्यांकडे सरकारचे होत असलेले दुर्लक्ष, तसेच राज्यात शासकीय कर्मचाऱ्यांच्या जुनी पेन्शन योजनेच्या मागणीकडे शासनाने जाणीव पुर्वक दुर्लक्ष करणे, राज्यातील नगरपालिका व महानगरपालिकांमधील प्रभाग व सदस्य संख्येची फेररचना, प्रभाग रचनेचे अधिकार स्वतःकडे घेण्याचा शासनाचा निर्णय, ९६ नगरपालिकांमध्ये ओबीसी आरक्षण, यासह न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणांमुळे निवडणूका दीर्घकाळ प्रलंबित असणे, प्रशासकीय नेमणूकीमुळे जनतेच्या कामावर होत असलेला परिणाम, महानगरपालिका, नगरपालिका व जिल्हापरिषदा यांच्या वर्षानुवर्ष निवडणूका झालेल्या नसल्यामुळे वाढलेला भ्रष्टाचार, एम.एस.आर.डी.सी व एम.एम.आर.डी.ए मध्ये अवास्तव कामाच्या निविदा मंजूर करुन सुरु असलेला भ्रष्टाचार, राज्यातील महानगरपालिकांमध्ये, विशेषतः मुंबई महानगरपालिकेत प्रशासकांकडून प्रकल्प रद्द वा स्थगित केले असणे, दुसऱ्या बाजूला जनप्रतिनिधी नसताना नवीन योजना व प्रकल्पांची घोषणा करुन निधीची उधळपट्टी होत असणे, मुंबईतील रस्त्यांचे काँक्रीटीकरणाचे काम सुरु झाले नसताना कंत्राटदारांना आगाऊ रकमांची वाटण्यात आलेली खिरापत, मुंबई महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात प्रभागनिहाय निधी वाटपात झालेला भेदभाव, नालेसफाईत होत असलेला विलंब, मेट्रो प्रकल्पग्रस्तांच्या घरवाटपात झालेली अनियमितता, मुंबईतील "बेस्ट" ही सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आर्थिक अडचणीत आली असणे, सौंदर्यीकरणाच्या नावाखाली महानगरपालिकेच्या निधीची होत असलेली उधळपट्टी, फिल्म सिटी, गोरेगाव ते शिडीपाडा, मुलुंड या दुहेरी बोगद्याच्या कामासाठी काढलेल्या निविदेत झालेली अनियमितता, मुंबई शहरातील सी-कोस्टल रोडचे काम संस्थ गतीने सुरु असणे, केईएम रुग्णालयात रुग्ण सहायता निधीत गैरव्यवहार झाला असणे, आपला दवाखान्यांमध्ये असलेला ओषधांचा तुटवडा, नादुरुस्त उपकरणे, केईएम व इतर रुग्णालयात सीटीस्कॅन, एमआरआयसारख्या मशीन बंद असणे, गिरणी कामगारांच्या घरांचा प्रलंबित प्रश्न, धारावी पुनर्विकास प्रकल्प व अन्य प्रकल्पांसाठी नेमलेल्या कंत्राटदार कंपनीविरोधातील गंभीर आरोपांमुळे प्रकल्प

अग्रिम प्रत

अडचणीत आले असणे. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या प्रधानमंत्री आवास योजनेत झालेला गैरव्यवहार, पनवेल व उरण तालुक्यात नैना प्रकल्पांतर्गत घातलेल्या जाचक अटींना होणारा विरोध, भिवंडी शहरात पंतप्रधान आवास योजनेचे थांबलेले काम, म्हाडाकडे देण्यात आलेले अधिकार शासनाने पुन्हा आपल्याकडे घेतल्याने निर्णयांना विलंब होत असणे, म्हाडा वसाहतीतील गृहनिर्माण संस्थांवर वाढीव सेवा शुल्काचा लादलेला बोजा, झोपु योजनेतील विकासकांकडून थकीत घरभाड्याची तातडीने वसुली करण्याची आवश्यकता, मुंबईतील सेस इमारतींचा रखडलेला पुनर्विकास, राज्यात विजेची प्रचंड होत असलेली मागणी, ट्रान्सफॉर्मर नादुरुस्त होण्याच्या घटनेमध्ये झालेली वाढ, वीजे अभावी शेतकऱ्यांच्या पिकांचे होत असलेले नुकसान, शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**(मंगळवार, दिनांक २१ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव)** —

**(ग)** **प्रा.राम शिंदे,** सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, विजय उर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री सुरेश धस, निलय नाईक, चंद्रशेखर बावनकुळे, रणजितसिंह मोहिते-पाटील, श्रीकांत भारतीय, विप्लव बाजोरीया, ज्ञानेश्वर म्हात्रे, राजहंस सिंह, प्रविण दटके, गोपिचंद पडळकर, प्रविण पोटे-पाटील, रमेशदादा पाटील, रामराव पाटील, रमेश कराड, वसंत खंडेलवाल, रामदास आंबटकर, महादेव जानकर, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव** —

"राज्यातील पुणे व नाशिक ही शहरे व्यापारी केंद्र असल्याने मुंबई, नागपूर, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्राशी जोडलेली असणे, या शहरांचा मुंबईच्या धर्तीवर विकास करण्याकरिता स्वतंत्र विकास आराखडा तयार असणे मात्र, त्यादृष्टीने शासनाकडून विकासात्मक कार्यवाही गतीमान करण्याची आवश्यकता असणे, पुणे शहरात विमानतळाकरिता जागा राखीव असून अन्य पायाभूत सुविधा तातडीने करण्याची आवश्यकता असणे, पीएमआरडीएच्या माध्यमातून रिंगरोड तयार करण्याची आवश्यकता असणे, पुणे महानगरपालिकेतील ३४ गावांचा सीटीसर्व्हे करुन विकास करण्याच्या दृष्टीने नियोजनबद्ध व कालबद्ध आराखडा तयार करण्याची आवश्यकता असणे, पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्याच्या विभाजनाच्या प्रलंबित प्रस्तावावर तातडीने

अप्रकाशित प्रत

विचार करण्याची आवश्यकता, स्वारगेट ते कात्रज, खडकवासला ते डेक्कन आणि हिंजवडी ते कात्रज मेट्रो रेल्वेच्या कामाला गती देण्याची आवश्यकता, वाढत्या अपघातांना रोखण्यासाठी मुंबई-बेंगलोर महामार्गावरील स्वामी नारायण मंदिर ते नरे जंक्शन उड्डाण पूल करण्याची आवश्यकता, हवेली तालुक्यातील मोठ्या ग्रामपंचायतींचे विभाजन करण्याची आवश्यकता, जुन्या ब्रिटीशकालीन वाड्यांचा पुनर्विकास करण्याची आवश्यकता असणे, सन २०२७ मध्ये नाशिक शहरात होणाऱ्या कुंभमेळ्याच्या दृष्टीने आवश्यक तयारी आतापासून करण्याची आवश्यकता, नाशिक शहरात पंतप्रधान आवास योजना गतिमान करण्याची आवश्यकता, नाशिक मधील गावठाण भागात असलेली छोटी घरे विकसित करण्याची व नाशिक मधील घरांचा क्लस्टर विकास करण्याची आवश्यकता, परराज्यातून येणारे उद्योग नाशिक शहरात आणण्याचे प्रयत्न करण्याची आवश्यकता, पुणे व नाशिक येथील सहकारी गृहनिर्माण सोसायट्या व गृहनिर्माण मंडळाच्या वसाहतींचे स्ट्रक्चरल ऑडिड करुन पुनर्विकास करण्याची आवश्यकता असून सहकार अधिनियमातील त्रुटी दूर करण्याची आवश्यकता असणे, पुणे व नाशिक येथील वाहतूक समस्या दिवसें-दिवस वाढत असल्याने व प्रवाशांना तासनतास रस्त्यावर खोळंबुन रहावे लागत असल्याने यावर तोडगा काढण्याकरिता वाहतुक समस्येचा अभ्यास करुन वाहतुक आराखडा तयार करण्याची आवश्यकता, पीएमआरडीएच्या माध्यमातून पुणे शहराचे डीपी प्लँन नव्याने तयार करण्याची आवश्यकता, व कँन्टोनमेन्ट एरिया पुणे महानगरपालिकेत समाविष्ट करण्याच्या दृष्टीने सुरु असलेली कार्यवाही अधिक गतीमान करण्याची आवश्यकता, पुण्यातील वाढत्या झोपडपट्टीची समस्या सोडविण्यासाठी झोपडपट्टी धोरण व नियमावली करण्याची आवश्यकता, पुणे-नाशिक रेल्वेची सुविधा करण्याकरिता केंद्रीय रेल्वे मंत्रालयाकडे मागणी करुन पाठपुरावा करण्याची आवश्यकता, राज्यात दारु व दुध भेसळीचे प्रकार दिवसें-दिवस वाढत असल्याने संबंधितांवर कठोर कारवाई करण्याच्या दृष्टीने अन्य भेसळ अधिनियमातील शिक्षेची तरतूद कठोर करण्याची आवश्यकता, केंद्राने सहकाराला बळकटी देण्याच्या दृष्टीने केलेल्या प्रयत्नाला राज्य व केंद्र शासनाने परस्पर सामंजस्याने प्रयत्न करण्याची आवश्यकता, राज्यातील बंद पडत असलेल्या सहकारी बँका, कृषी सहकारी संस्था यांना बळकटी देऊन उर्जितावस्थेत आणण्याची आवश्यकता, प्रायमरी अँग्री क्रेडीट सोसायट्या गावपातळीवर काढण्याबाबत केंद्र शासनाने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने राज्यात जलदगतीने कार्यवाही करण्याची आवश्यकता,

अस्सुधारित प्रत

राज्यातील बेरोजगारांच्या सहकारी संस्थांना पाठबळ देण्याची आवश्यकता, गृहनिर्माण संस्थांच्या स्वयं पुनर्विकासासंबंधात स्वतंत्र धोरण आणण्याची आवश्यकता, राज्यातील सहकारी चळवळ बळकट करण्याची व पतपेढ्यांमधील ५ लाखापर्यंतच्या ठेवींना संरक्षण देण्याची आवश्यकता, राज्यातील प्रगत शिक्षण संस्थापैंकी काही संस्था राजकीय अड्डे बनले असल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होणारा विपरीत परिणाम, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**नऊ : अर्धा-तास चर्चा – म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) –**

**(मंगळवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३, सोमवार, दिनांक २० मार्च, २०२३ व मंगळवार, दिनांक २१ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु प्रलंबित असलेली अर्धा-तास चर्चेची सूचना) [अनुक्रमांक १]**

(१) **सर्वश्री विलास पोतनीस,** सुनिल शिंदे, ॲड.अनिल परब, **वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"संपूर्ण महाराष्ट्रात सुमारे १०,००० गिरीभ्रमण आणि गिर्यारोहण आयोजक आणि संस्था असून त्यांच्यामार्फत गिर्यारोहकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने उपक्रम राबविण्यात येत नसल्यामुळे गिरीभ्रमण आणि गिर्यारोहण दरम्यान प्राणघातक अपघात होत असल्याचे निदर्शनास आले असून गत तीन दशकांत गिरीभ्रमण, गिर्यारोहण आणि इतर साहसी उपक्रमांत सहभाग घेणाऱ्यांची संख्या वाढलेली असणे, परंतु याकरिता योग्य अनुभव आणि साधनसामुग्री, कुशल संघटन आणि सुरक्षिततेसाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांकडे लक्ष दिले जात नसणे, अतिरंजित जाहिरातींना बळी पडून अनुभवी, उत्साही पर्यटक आकर्षित होणे, आयोजकांकडून मात्र 'सुरक्षा' या विषयाकडे दुर्लक्ष होत असणे, त्यामुळे अपघाताची संख्या वाढली असून याबाबत कठोर नियमन करणे गरजेचे असून अशा उपक्रमांवर बंदी घालून जीवितहानी रोखण्यासाठी नियमन व्यवस्था कार्यान्वित करुन या गिरीभ्रमण आणि गिर्यारोहण आणि इतर साहसी उपक्रमांत सहभाग घेणा-या पर्यटकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कठोर नियमन कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(बुधवार, दिनांक ०१ मार्च, २०२३, सोमवार, दिनांक २० मार्च, २०२३ व मंगळवार, दिनांक २१ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु प्रलंबित असलेली अर्धा-तास चर्चेची सूचना) [अनुक्रमांक २]**

(२) **सर्वश्री अमोल मिटकरी,** शशिकांत शिंदे, विक्रम काळे, **वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"मातृतीर्थ सिंदखेडराजा येथे जिजाऊ जन्मोत्सव सोहळा दरवर्षीप्रमाणे यंदाही दिनांक १२ जानेवारी, २०२३ रोजी मोठया उत्साहाने साजरा होणे, दरवर्षी "मातृतीर्थ सिंदखेडराजा येथे जिजाऊ जन्मोत्सव सोहळयाकरिता महाराष्ट्र व शेजारील कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगणा, मध्यप्रदेश, छत्तीसगड, गुजरात, गोवा या राज्यातून लाखो पर्यटक जिजाऊ जन्मोत्सव सिंदखेडराजा येथे येत असणे, पर्यटकांसाठी सदर ठिकाणी मुलभूत सोयी-सुविधा नसल्याने पर्यटकांची गैरसोय होत असणे, पर्यटकांना अनेक समस्यांना सामारे जावे लागत असणे, सदर पर्यटन स्थळाचा विकास करण्यासाठी संपूर्ण परिसराचा विकास आराखडा तयार करुन मोठया प्रमाणात निधी उपलब्ध होण्याची आवश्यकता असणे, पर्यटनाच्या माध्यमातून येथे मोठया प्रमाणात रोजगार निर्मिती होऊ शकेल व महाराष्ट्राच्या ऐतिहासिक अस्मितेचा वारसा सांगणारी जिजाऊ सृष्टी मातृतीर्थ सिंदखेडराजाचा विकास करणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(गुरुवार, दिनांक १६ मार्च, २०२३ व मंगळवार, दिनांक २१ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु प्रलंबित असलेली अर्धा-तास चर्चेची सूचना) [अनुक्रमांक ३]**

(३) **श्री. सचिन अहिर,** श्री. विलास पोतनीस, श्री. सुनिल शिंदे, **वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"चुनाभट्टी (मुंबई) येथील टाटानगर इमारत वसाहतीमध्ये १२२ कुटुंबे २१ वर्षांपासून वास्तव्यास असणे, सदर ठिकाणची स्वदेशी मिल दिवाळखोरीत गेल्याने मिल बंद असणे, मिल बंद असल्याकारणामुळे टाटानगर इमारत वसाहतीची देखभाल, डागडुजीची कामे बंद असणे, त्यामुळे जीर्ण झालेल्या इमारतींवर मोठ्या प्रमाणावर झाडे-झुडपे वाढून इमारतींची दुरवस्था झाली असणे, इमारतींवर वाढलेल्या झाडा-झुडपांमुळे इमारतींचा भाग वारंवार कोसळत असणे, पावसाळ्यातही पावसाचे पाणी घरात येऊन इमारत परिसरात

अप्रकाशित प्रत

वारंवार शॉर्टसर्किट चे प्रकार होत असणे, याप्रकरणी तेथील रहिवाशांनी शासनाकडे अनेकदा तक्रारी करुनसुध्दा शासनाकडून दखल घेतली जात नसणे, त्यामुळे दुरवस्थेतील सदर इमारत कोसळण्याची शक्यता निर्माण होऊन रहिवाशांच्या जीवितास धोका निर्माण झाला असणे, याबाबत शासनाने चौकशी करुन टाटानगर इमारत वसाहतीची तात्काळ देखभाल, दुरुस्ती अथवा पुनर्बांधणी करण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(सोमवार, दिनांक २० मार्च, २०२३ व मंगळवार, दिनांक २१ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु प्रलंबित असलेली अर्धा-तास चर्चेची सूचना) [अनुक्रमांक ४]**

(४) **श्री. प्रसाद लाड,** ॲड. निरंजन डावखरे, श्री.रमेश पाटील, **वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"गुरचरण जमिनीवर पिढ्यानपिढ्या वास्तव्यास असणाऱ्या, कब्जेधारक आदिवासी कुटुंबांना वगळण्यात यावे, यासाठी मा.उच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करण्यात यावी जेणेकरुन या आदिवासी भूमीपुत्रांवर अन्याय होणार नाही. गायरान जमिनींवरील अतिक्रमणासंदर्भात मा.उच्च न्यायालयाने या याचिकांना दिनांक २८ फेब्रुवारी, २०२२ पर्यंत दिलेल्या स्थगितीदरम्यान पालघर जिल्ह्यात अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली गुरचरण जमिनीवरील अतिक्रमणे व बेकायदेशीर बांधकामे तेथील तहसिलदारांनी पोलीस बंदोबस्तांमध्ये निष्कासित करुन अतिक्रमणाच्या जागा संबंधित ग्रामपंचायतीच्या ताब्यात देण्यासाठी सूचित करण्यात आले असतानाही शासनाची भूमिका स्पष्ट झालेली दिसून येत नाही, पालघर जिल्ह्यात निष्कासित केलेल्या तारापूर मंडळ अधिकारी क्षेत्रातील केळवा रोड परिसरातील तसेच कुंभोवली येथील गुरचरण जमिनीवरील अतिक्रमणे नागरिकांनी निष्कासित केली असूनही तेथील दोन हेक्टर जागा ईएसआयसी रुग्णालयाच्या उभारणीकरिता हस्तांतरित करण्याच्या दृष्टीने प्रस्ताव तयार केला असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून प्राप्त झाली आहे सबब, सदर प्रकरणी सखोल चौकशी करण्यात येऊन याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

अग्रिम प्रत

**(मंगळवार, दिनांक २१ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु प्रलंबित असलेली अर्धा-तास चर्चेची सूचना) [अनुक्रमांक ५]**

**(५)** **सर्वश्री चंद्रशेखर बावनकुळे,** रामदास आंबटकर, प्रवीण दटके, **वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"राज्यातील आरोग्य यंत्रणा अधिक बळकट करण्यासाठी अर्थसंकल्पात विशेष तरतूद करून कोटयवधी रूपयांचे अनुदान आरोग्य विभागाला मिळत असणे, राज्यातील सन २०२१-२०२२ मध्ये १४३५ गरोदर मातांचा मृत्यू झाला असल्याची बाब निदर्शनास येणे, मागील वर्षाच्या तुलनेत १६० ने अधिक सदर गरोदर मातांच्या मृत्युच्या प्रमाणात वाढ झाली असणे, रक्तस्त्राव, उच्च रक्तदाब व यामुळे होणाऱ्या गुंतागुंतीमुळे मृत्यू होणे, याचा आरोग्य सेवेवर परिणाम होणे, महानगरामध्ये गरोदर मातांच्या मृत्यूचे प्रमाण वाढल्याने कोटयवधी रूपये खर्च करूनही गरोदर महिलांची प्रसुती सुलभपणे होत नसल्याचे सदर बाबींवरुन निदर्शनास येणे, माता अन्वेषण समितीच्या अहवालानुसार रक्तस्त्रावामुळे १३ टक्के, जंतुसंसर्गामुळे १७ टक्के, उच्च रक्तदाबामुळे १६ टक्के, इतर कारणामुळे जवळपास १७ टक्के व अनिश्चितीमुळे २१ टक्के गरोदर मातांचे मृत्यू झाल्याचे स्पष्ट होत असणे, महानगरपालिका क्षेत्रात पुणे -४६, कोल्हापूर -१७, सांगली -३३, औरंगाबाद -२५ माता महिलांचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे आरोग्य सुविधा व आरोग्य यंत्रणा सक्षम असुनही गरोदर मातांच्या मृत्यूचे प्रमाण वाढणे त्यामुळे तातडीने राज्यातील गरोदर मातामृत्यू प्रकरणे रोखण्याबाबत व आरोग्य सुविधा अधिक बळकट करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(मंगळवार, दिनांक २१ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) [अनुक्रमांक (६ व ७)]**

**(६)** **सर्वश्री विलास पोतनीस,** सुनिल शिंदे, आमश्या पाडवी, **वि.प.स.**

"**मेळघाटातील बालमृत्यू रोखण्याबाबत**" या विषयावरील श्री.विलास पोतनीस, वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक १६९५३ ला दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर

चर्चा उपस्थित करतील.

(७) **सर्वश्री सुनिल शिंदे,** विलास पोतनीस, आमश्या पाडवी, **वि.प.स.**

"**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची भाडे तत्वारील गृहनिर्माण योजनेतील पनवेल परिसरातील घरे गिरणी कामगारांना देण्याबाबत**" या विषयावरील श्री.प्रसाद लाड, वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक १७१९५ ला दिनांक ०३ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**(मंगळवार, दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी बॅलटमध्ये आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) [अनुक्रमांक ८ व ९]**

(८) **सर्वश्री अमोल मिटकरी,** शशिकांत शिंदे, विक्रम काळे, **वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"अकोला जिल्ह्यामध्ये ६५ किलोमेगावॅटचा पारस विद्युत प्रकल्प सन १९६३ मध्ये सुरु झाला असणे, त्यानंतर सन १९९९ साली त्याच ठिकाणी २५० मेगा किलोवॅटच्या दोन प्लाँटना मंजुरी मिळालेली असणे, तसेच २००२ साली ६६० मेगा किलोवॅट मिळून बाराशे पंचवीस मेगावॅट मंजुरी मिळालेली असणे व त्यासाठी शासकीय जमीन संपादित करुन घेऊन त्यावर शासन निधीदेखील खर्च करण्यात आलेला असताना तत्कालीन ऊर्जा मंत्री यांचे कार्यकाळात पारस (जि.अकोला) ऐवजी ६६० मेगा किलोवॅटचा प्रकल्प चंद्रपूर येथे हस्तांतरीत करण्यात आलेला असणे, अकोला जिल्ह्यातील जनतेवर अन्याय होणे, सबब, शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(९) **श्री.आमश्या पाडवी,** डॉ.मनिषा कायंदे, श्री.सचिन अहिर, **वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"आदिवासी विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नयेत, त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणून जगण्याचा आधार मिळावा या उद्देशाने शासनाने राज्यात शासकीय व अनुदानित आश्रमशाळा सुरु केलेल्या आहेत, परंतु याच आश्रमशाळा आता आदिवासी मुलांच्या मृत्यूचा अड्डा झाल्या आहेत. गेल्या पाच वर्षात राज्यातील शासकीय व अनुदानित आश्रमशाळेतील तब्बल ११२६ आदिवासी विद्यार्थ्यांचे मृत्यू झाल्याची बाब गेल्या काही दिवसांपूर्वी निदर्शनास आली आहे, यामध्ये विविध आजारामुळे मृत्यू होण्याचे प्रमाण अधिक

अप्रकाशित प्रत

असल्याचे निदर्शनास येत आहे, आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना वेळेवर व चांगल्या दर्जाचे औषधोपचार वा आरोग्य सेवा न मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याचे अनेक वेळा निदर्शनास येत आहे, परंतु शासनाचे याकडे दुर्लक्ष झाल्यामुळे मृत्यूच्या प्रमाणात दिवसेंदिवस वाढ होत आहे, विविध आजारांमुळे विद्यार्थ्यांचे मृत्यू होत असल्याचे सांगण्यात येत असले तरी एवढ्या मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांच्या मृत्यूचे नेमकी कारणे काय आहेत याचे विश्लेषण शासनाने अद्यापही केलेले नाही, याबाबत आदिवासी मुलांच्या हक्क, अधिकारांसाठी कार्यरत असलेल्या विविध संस्था-संघटनांकडून शासनाकडे विचारणा करण्यात येत आहे, परंतु त्याकडे शासनाने जाणीवपुर्वक दुर्लक्ष केले आहे. राज्य सरकार आश्रमशाळेतील आदिवासी विद्यार्थ्यांचे पालकत्व स्वीकारत असेल तर मृत्यू झालेल्या विद्यार्थ्यांची जबाबदारीही शासनाने स्वीकारली पाहीजे, सर्व प्रथम शासनाने आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या मृत्यूचे ऑडिट करुन मृत्यू मागची नेमकी कारणे काय आहेत याचा शोध घेण्याची तसेच भविष्यात आदिवासी विद्यार्थी मृत्यूच्या जाळयात सापडू नयेत याकरीता ठोस निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे. यासंदर्भात शासनाने आतापर्यंत केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २१ मार्च, २०२३.

**राजेन्द्र भागवत**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

अमुद्रित प्रत